## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मधु मंगेश कर्णिक

भारतीय साहित्याचा वारसा हिमालयाएवढा उत्तुंग आणि गंगामातेप्रमाणे सखोल आणि अस्खलित प्रवाही आहे. रामायण, महाभारत ही महाकाव्ये असोत वा कालिदास भवभूती, भर्तृहरी, बाणभट्ट, रघु यांच्या रचना असोत, त्यांना जगाच्या वाडमयीन इतिहासात तोड नाही. महाराष्ट्राच्या आधुनिक साहित्य परंपरेलाही भारतीय पार्श्वभूमीला वारसा लाभलेला असल्याने मराठी साहित्याच्या सर्व शाखा समृध्द झालेल्या दिसून येतात. साहित्याने मानवी संस्कृती उन्नत होते. किंबहुना साहित्य आणि संस्कृती यांचा मनोहर समन्वय ज्या मानवसमूहामध्ये घडून आलेला आढळतो, तो मानवसमूह जगाच्या पाठीवरील अत्यंत सुसंस्कृत, अभिरुचीसंपन्न आणि आंतरिक उन्नयनाने प्रगल्भ, परिपक्व झालेला आढळतो. यासाठीचे साहित्य – संस्कृतीच्या विकासाठीच प्रयत्नशील राहणे ही कोणत्याही समाजाची वा शासनाची महत्वाची गरज मानली पाहिजे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेचच नॅशनल बुक ट्रस्ट, साहित्य अकादमी, ललित कला अकादमी यासारख्या संस्कृतीवर्धक संस्था राष्ट्रीय पातळीवर स्थापन करण्यात आल्या. महाराष्ट्रापुरते उल्लेख करायचा झाल्यास, यासाठी महाराष्ट्राचे स्वतंत्र भाषिक राज्य निर्माण होण्याची, १९६० पर्यंतच्या काळाची मराठी समाजाला वाट पहावी लागली. त्यानंतर प्रथमच येथे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ या स्वतंत्र संस्थेची निर्मिती झाली. त्या काळातील महानविद्वान तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची या महत्त्वाच्या राज्यव्यापी शिखर संस्थेचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली. अशा रितीने महाराष्ट्राची साहित्य संस्कृती शासकीय स्तरावर संस्थापक पध्दतीने विकसित होऊ लागली.

शास्त्रीजींनी आपल्यासमोर साहित्यसंस्कृतीचा एक विशाल पट ठेवलेला होता. महाराष्ट्राच्या साहित्यसंस्कृतीबरोबरच अभिजात प्राचीन भारतीय साहित्य त्यांना अभिप्रेत होतेच, परंतु पौर्वात्य व पाश्चिमात्य भाषांतील साहित्यिक, दर्शन तत्त्वज्ञान, विज्ञान, इतिहास, व्याकरण, धर्म आदि क्षेत्रेही त्यांना वर्ज्य नव्हती. लिखित साहित्याबरोबर मौखिक साहित्य जपणाऱ्या बोलीभाषांचाही त्यांनी विचार केलेला होता. विश्वकोषाची संकल्पना त्यांचीच अशा रीतीने साहित्य संस्कृतीच्या विविध आणि व्यापक कक्षा ध्यानात घेऊन त्या रुंदावण्यासाठी त्यांनी साहित्य संस्कृती मंडळाचा माध्यम म्हणून उपयोग करण्याचे ठरवले.

शास्त्रीजींनी साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना करताना जी मूळ उद्दिष्टे निश्चित केली. त्यानुसार त्या मंडळाचा कारभार सुरळीतपणे चाललेला होता. महाराष्ट्रातील विद्वान, साहित्यिक, समीक्षक आदींचा समावेश मंडळाच्या सदस्यामध्ये होत असे. कालांतराने विश्वकोष मंडळाला स्वतंत्र स्थान देण्यात आले व विश्वकोष रचना त्या शाखेकडे सोपविण्यात आली. तर्कतीर्थानंतर साहित्य संस्कृती मंडळाची धुरा अनेक साहित्यिकांनी सांभाळली.
२००६ मध्ये माझी या मंडळाचा अध्यक्ष म्हणून शासनाने नियुक्ती केली. शास्त्रीजींनी ज्या आसनावर बसून काम पाहिले. त्यावर बसून त्यांचे कार्य पार पाडण्यामागील व्यापक जबाबदारीची अर्थातच मला पुरेपुर जाणीव होती व आहे.

मी पदभार स्वीकारण्याआधी जवळ जवळ दीड वर्षभर मंडळाला अध्यक्ष नव्हता. २००४ च्या अखेरीस जुने मंडळ विसर्जित होऊन नवे मंडळ स्थापन झालेले होते. त्यामध्ये अनेक नव्या जुन्या साहित्यिक, समीक्षक, नाटककार यांचा समावेश होता. पण अध्यक्षांची नियुक्ती न झाल्यामुळे मंडळाची एकही बैठक झालेली नव्हती. सर्व कारभार

प्रभारी सचिव पहात होते. एकही सांस्कृतिक उपक्रम वा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला नव्हता. अनेक प्रकल्प व उपक्रम अर्थवट पडले होते. एका उत्कृष्ट परंपरा असलेल्या महत्त्वाच्या शासकीय मंडळाचे कार्य खंडित झाले होते. ते मला सुरु करुन नव्याने काही उपक्रम सुरु करावयाचे होते. पण एक गोष्ट मला अनुकूल होती. मी या मंडळावर सदस्य म्हणून अनेक वर्षे काम केलेले असल्यामुळे तेथील कार्यालयीन व्यापाची आणि उद्दिष्टांची मला बऱ्यापैकी माहिती होती. तेथील कर्मचारी, अधिकारी परिचयाचे होते. माझे काम साहित्य – सांस्कृतिक स्वरूपाचे होते. व त्याविषयीच्या माझ्या काही निश्चित कल्पना होत्या. सर्व प्रथम मी मंडळातर्फे प्रकाशित होणारी संकल्पित प्रकाशने हाती घेतली. त्यातील बरीच प्रकाशने शासकीय मुद्रणालयामध्ये छपाईसाठी प्रलंबित होती. काहीच्या नव्या आवृत्या तातडीने काढायच्या होत्या. शासनाचे एक अनाकलनीय धोरण, सुरुवातीपासून असे आहे. की विविध विषयांवरील पुस्तके साहित्य संस्कृती मंडळाने प्रकाशित करायची व ती बव्हंशी उद्योगखात्याच्या अखत्यारीत असलेल्या शासकीय मुद्रणालयाच्या ग्रंथागारांमार्फतच विकायची. त्याचा विक्रीव्यवस्था साहित्यसंस्कृती मंडळाच्या हाती नसते. त्यामुळे मंडळाने प्रकाशित केलेला.

एखादा उत्तम ग्रंथ वाचकास हवा असेल तर त्याला ते मुंबई पुण्याच्या पुस्तक पेठेत खासगी विक्रेत्याकडे मिळणार नाही, त्यासाठी त्याला मुंबईत चर्नीरोड यथील शासकीय ग्रंथागारात, पुणे येथे फोटोझिंको प्रेसमध्ये ग्रंथागारात, कोल्हापूर येथे ताराबाई पार्कमधील ग्रंथागारातच जावे लागणार व तेही कार्यालयीन वेळेमध्ये यामुळे मंडळाची उत्तमोत्तम प्रकाशने वाचकांना सहजपणे उपलब्ध होत नव्हती. ही व्यवस्था बदलून मंडळाची पुस्तके खाजगी विक्रेत्यांमार्फत कशी वितरित करता येतील, ते पाहण्याचा मी प्रयत्न सुरु केला.

शासकीय मुद्रणालयामध्ये जवळ जवळ एकवीस पुस्तके छपाईसाठी दिलेली होती. त्यातील महात्मा फुले समग्र वाडमय ६ वी आवृत्ती, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाडमय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, सावित्रीबाई फुले काळ आणि कर्तृत्व, महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड, प्रबोधनकार ठाकरे समग्र वाडमय, महान भारतीय क्रांतिकारक प्रथम पर्व, लोकजीवन आणि लोकसंस्कृती वाडमय कोश, महाराष्ट्राचे शिल्पकार यासारखी पुस्तके मी तातडीने छापवून घेऊन वाचकांना उपलब्ध केली. परंतु नवे प्रकल्प हाती घेण्यापूर्वी आधीच्या अर्धवट पडलेल्या प्रकल्पांना गती देणे. मला अधिक महत्त्वाचे वाटले अशा प्रकल्पांपैकी एक अत्यंत महत्वाचा आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्र्यांनी हाती घेऊन ज्यांची सुरुवात केली होती, तो महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणजे मराठी शब्दकोश हा होता. मराठी मध्ये अनेक शब्दकोश आहेत. त्याचा समुचित उपयोग करून आजच्या प्रचलित मराठी भाषेतील, प्रादेशिक मराठीतील व ऱ्हाडी, कोकणी, अहिराणी यासारख्या मराठीच्या समृध्द बोलीतील, दलित साहित्यातील, नव्या वैज्ञानिक संकल्पनातील, अनेक नव्या शब्दांचा समावेश करून एक अद्यावत बृहत् शब्दकोश मराठीचा असावा, या संकल्पनेतून मी मराठी शब्दकोशाच्या मंडळाच्या अर्धवट राहिलेल्या बाजूला पडलेल्या प्रकल्पाला गती देऊन ती पूर्णवस्थेला नेण्याचे ठरविले. या बाजूला पडलेल्या शब्दकोशासाठी डॉ. नी. गो. कालेलकर, डॉ. अशोक केळकर, डॉ. वि. रा. करंदीकर यासारख्या दिग्गज तज्ज्ञांनी योगदान केले होते. तरीही अनेक कारणामुळे या शब्दकोशाची प्रगती चार खंडापर्यंतच होऊन पुढील काम खंडित झाले होते.

संकल्पित कोशावर लाखो रुपये मंडळाने खर्च करूनही त्याचे हस्तलिखित बासनात अस्पर्श असू पडून होते. मी हे बासन उघडण्याचे ठरवले. अर्धवट राहिलेले चार खंड प्रथम पूर्णावस्थेला न्यायचे होते. सुदैवाने माझ्या अध्यक्षतेखालील पुनर्रचित मंडळामध्ये परभणीचे प्राचार्य रामदासजी डांगे यांचा समावेश होता. त्यांनी ज्ञानेश्वरीवर, वारकरी, संप्रदायावर पूर्वी काम केलेले होते. कोशनिर्मितीची तंत्रे त्यांना अवगत होती. त्यांचा या कामासाठी उपयोग करून घेण्याचे ठरवून त्यांना मंडळाची मान्यता घेतली. आणि पुणे येथील मंडळाच्या कार्यालयामध्ये, जे तोपर्यंत

जवळ जवळ रिकामेच होते, मराठी शब्दकोश निर्मिती प्रकल्प सुरू केला. एक जुलै २००७ पासून प्राचार्य रामदास डांगे यांच्या प्रमुख हा प्रकल्प सुरू झाला आहे. पंधरा हजार शब्दाचा एक खंड याप्रमाणे सुमारे दीड लक्ष शब्दांचा, दहा खंडामध्ये या कोशामध्ये अंतर्भाग होणार आहे. या कोश प्रकल्पाच्या कामी मला आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कोशतज्ञ डॉ. प्रमोद ततगेरी यांचे मार्गदर्शन झाले, जर्मनी सारख्या पाश्चिमात्य आणि जपानसारख्या पौर्वात्य राष्ट्रांमध्ये कोशकार्य किती मोठ्या व्यापक प्रमाणात चालू आहे, ऑक्सफर्ड, वेब्सटर सारखे कोश कार्य कसे वर्षानुवर्षे चालत असते. त्यांचे अद्यावतीकरण कसे अव्याहत केले जाते, एवढेच नव्हे तर मी माझ्या कार्यालयात घेतलेल्या कोशविषयक बैठकांना ते दोनदा उपस्थित राहिले आणि त्यांच्याशी उपयुक्त चर्चा होऊ शकली. १९९५ पासून बाजूला पडलेले एक महत्वाचे साहित्य संस्कृतीचे काम माझ्या कारकीर्दीत मला पुन्हा सुरु करता आले, याबद्दल धन्यता वाटते.

आधुनिक मराठी कवितेचे जनक कविवर्य केशवसुत यांची स्मृति शताब्दी २००५ सालची, परंतु त्यासाठी शासकीय पातळीवर कोणताही कार्यक्रम झाला नव्हता. मी अध्यक्षपदी आल्यावर केशवसुताच्या कविताचा यथामूल आवृत्तीचे पुर्नमुद्रण हाती घेतले. १९६६ साली त्या काळच्या शासनाने केशवसुतांच्या समग्र काव्याची यथामूल आवृत्ती प्रकाशित केली होती. निमित्त होते. केशवसुत जन्मशताब्दीचे, त्यानंतर लवकरच ती आवृत्ती संपली आणि अभ्यासकांसाठी संग्राहकांसाठी ते पुस्तक उपलब्ध होत नव्हते. आता पुनर्मुदित आवृत्ती वाचकांसाठी तयार झालेली आहे. केशवसुतांची कविता हे महाराष्ट्राचे वाड़मयीन संचित आहे. व ते पिढ्यानपिढ्या सांभाळण्याचे काम माझ्या पिढीने केले पाहिजे. साहित्यसंस्कृती मंडळातर्फे ते मला करता आले ही भाग्याची बाब होय.

मराठी वाड़मयकोश हाही मंडळाचा एक महत्वाकांक्षी प्रकल्प. संकल्पित चार खंडापैकी दोन खंड पूर्वीच प्रकशित झाले होते. मी उर्वरित खंडासाठी संपादक नेमून त्यांचे काम मार्गी लावू शकली.  पूर्वसूरींनी महाराष्ट्राचा इतिहास लिहिण्याचे काम सुरु करून शिवकालापासून चा इतिहास डॉ. खोबरेकर या इतिहासकारांकडून लिहवून घेतला. पेशवे कालखंडाचे मुद्रण चालू आहे. त्यानंतरचा आधुनिक महाराष्ट्र हा खंड प्रा. भा. ल. भोळे या विचारवंत व आधुनिक महाराष्ट्राचा अभ्यास असलेल्या लेखकांकडे सोपविला आहे. २००० सालापर्यंतचा महाराष्ट्र राज्याची भाषिक तत्वावर निर्मिती झाली, त्यानंतरचा पन्नास वर्षाचा सांस्कृतिक इतिहास सांस्कृतिक महाराष्ट्र या नावाने प्रसिध्द होईल. त्यासाठी महाराष्ट्र संस्कृतीचे विविध पैलू व अंगे अधोरेखित करणारे लेख निरनिराळ्या जाणकार लेखकांकडून मागविण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र निर्मितीनंतरचे सर्व सांस्कृतिक वळण, विकास आणि न्यून या बृहद्‌ग्रंथामध्ये वाचावयास मिळतील.

'महाराष्ट्राची रंगभूमीआणि चित्रपटसृष्टी याची उज्वल परंपरा आहे. भारतामध्ये या दोन क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राने जेवढी प्रगती केली आहे तेवढी अन्यत्र आढळत नाही. या दोन क्षेत्राच्या उगम बिंदूपासून आजतागायत अद्यावत व समग्र इतिहास लिहिला जाणे अगत्याचे होते. या दृष्टीने मराठी रंगभूमीचा समग्र इतिहास आणि मराठी चित्रपट सृष्टीचा समग्र इतिहास हे दोन ग्रंथ मंडळाच्या विचाराधीन आहेत. आधुनिक विज्ञानाचा महाराष्ट्रातील विशेषतः ग्रामीण भागातील बहुजसमाजाला परिचय व्हावा, त्यांचे ज्ञान व्हावे या उद्दिष्टाने विज्ञान कोश सिध्द करण्याचा प्रकल्पही मराठी विज्ञान परिषदेच्या सहकार्याने हाती घेतला आहे. महाराष्ट्राचे शिल्पकार या चरित्रमालेचाही मंडळातर्फे पुनर्विचार करण्यात आता. या मालेमध्ये प्राचीन काळापासून चरित्रे येण्याऐवजी विसाव्या शतकामध्ये ज्या कर्तृत्ववान व्यक्तींनी आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून कार्य केले त्यांना चरित्रांकित करावे असा निर्णय घेण्यात आला. मंडळातर्फे वाडमयीन शिबिरे, कार्यशाळा घेतल्या जातात. त्यामध्ये महाराष्ट्रातील विविध प्रदेशातील विद्यापीठाचा, त्यांच्या मराठी विभागाचा सहयोग घ्यावा असाही निर्णय घेण्यात आला. कारण भाषा साहित्य विज्ञान यांच्या

सांस्कृतिक विकासामध्ये विद्यापीठाचा मोठा सहभाग असतो. मुंबई, कोल्हापूर, नांदेड, जळगांव, येथील मंडळाची वेबसाईट संकेतस्थळ निर्मितीबाबतही तयारी सुरु झालेली आहे. अशात तऱ्हेने जुन्या उपक्रमांबरोबर नव्या काळाच्या संदर्भात नवेनवे उपक्रमही राबविण्यात यावेत, अशा दृष्टीकोनातून नवे धोरण निश्चित करण्यात आले. साहित्य संस्कृती मंडळातील साचलेपणा जाऊन तेथे नवीन उपक्रमांनी नवे सांस्कृतिक वातावरण निर्माण व्हावे.

यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न सुरु झालेले आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ ही महाराष्ट्र शासनाची सर्वात जुनी सांस्कृतिक कार्यासाठी स्थापन झालेली शिखर संस्था म्हटली जाते. तिचे व अशासकीय पध्दतीने तत्सम कार्य करणाऱ्या अन्य साहित्यसंस्था यांचे परस्पर सहकार्य रहावे, संपर्क राहावा असे साहित्यसंस्कृती मंडळाला नेहमीच वाटत आलेले आहे. या खाजगी साहित्य संस्थांना त्यांचे वाड़मयीन उपक्रम अधिक सक्षमपणे राबवता यावेत, या हेतूने शासनाने त्यांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे ग्रॅट – इन – एड या स्वरूपात अनुदान १९९० सालापासून घ्यायला सुरुवात केली होती. परंतु त्यात वाढ व्हावी अशी या संस्थांनाची मागणी मुख्यमंत्री श्री विलासराव देशमुख यांनी मान्य करुन महाराष्ट्रातील साहित्य कार्य करणाऱ्या सात संस्थाना प्रत्येकी प्रतिवर्षी पाच लाखांचे वाढीव अनुदान मंजूर केले व मी मंडळाचा अध्यक्ष झाल्यानंतर त्याबाबतचा शासन आदेश (जीआर) प्रसिध्द झाला शासनाकडून अनुदानाची रक्कम येताच माझ्या कार्यालयाने ती तात्काळ संबोधित साहित्यसंस्थांकडे पाठवून दिली.

शासकीय अनुदानाचे विशिष्ट प्रकार असतात. शाळा, ग्रंथालये, गरीब विद्यार्थ्यांची वसतीगृह आदि लोकोपयोगी संस्थांना शासन कायम स्वरूपी अनुदान देते. त्याला ग्रॅड – इन एड म्हणतात. ते सशर्त व नियमांनी बांधलेले असते. त्याला अंतर्गत व शासकीय ऑडीट असते. शासकीय तपासणी असते.

त्यानुसार त्याचा विनियोग होतो. पूर्वीच्या खर्चावर पुढील वर्षाचे अनुदान अवलंबून असते. जनतेच्या पैशाचा व्यय व्यवस्थित शिस्तबध्द पध्दतीने व्हावा, ही त्यामागील भूमिका असते. अनुदानामागील उद्दिष्टे सुस्पष्ट असतात व त्यानुसार खर्च होतो की नाही, हे पाहण्याची जबाबदारी शासन, अनुदान वितरीत करणाऱ्या एजन्सीकडे सोपवते. उदा. शाळांना दिले जाणारे अनुदान शिक्षणाधिकारी तपासतात, ग्रंथालयाचे अनुदान ग्रंथालय संचालक तपासतात. ग्रॅडइन एड अनुदानाला कॅग ही महालेखापालाची यंत्रणा तसेच विधानसभेची सार्वजनिक लेखासमिती जबाबदार असते व तिच्यामार्फत अनुदान वितरीत करणाऱ्या या एजन्सीवर अंकुश असतो. सार्वजनिक निधी अद्दिटांनुसार व लोकोपयोगी कारणासाठी खर्च केला जावा, हे पाहण्यासाठी ही सगळी प्रशासकीय व्यवस्था असते. ग्रॅड इन एड अनुदान संस्थांच्या चरितार्थासाठी, योगक्षेमासाठी कधीही दिले जात नाही. तर ते विशिष्ट उद्दिष्टे ठरवून त्यासाठीच मंजूर केलेले असते.

दुसऱ्या प्रकारचे अनुदान सानुग्रह स्वरूपाचे एक्सग्रॅशिया असते. ते दानरूपी एकदाच दिले जाते. त्यासाठी जे कारण असते ते तत्कालिक असल्यामुळे या अनुदानाला नियमावलीची कठोरता नसते. याशिवाय मदत म्हणून सबसिडीच्या स्वरुपातही तात्कालिक कारणांसाठी अनुदान मिळते. उदा. कांदा व द्राक्षे, आंबा, कापूस अशा पिकावरील रोगामुळे झालेल्या नुकसान भरपाई दाखल प्रसंगवशात हे अनुदान शासन खास बाब म्हणून मंजूर करते. त्यासाठीही ऑडीट वा नियमावलीची कठोरता नसते. लाभार्थींना तो एक प्रकारचा

खास लाभ देण्यात येतो. या अनुदानापेक्षा ग्रॅड इन एड हे वेगळे व स्थायीस्वरूपाचे व नियमातीच्या, उद्दिष्टांच्या आधीन जाते.

साहित्य परिषदांना देण्यात येणाऱ्या ग्रँड इन एड स्वरुपाच्या अनुदानाबाबत एड स्वरुपाच्या अनुदानाबाबत साहित्यसंस्कृती मंडळाच्या हिशोबाची महालेखापालांच्या हिशेबतपासनीसानी तपासणी केली असता, त्यांनी साहित्य परिषदांनी पाठवलेले हिशोब तक्ते तपासले व अनेक आक्षेप (ऑडीट ऑब्जेक्शन्स) नमूद केले. तसेच साहित्य संस्थांचे हिशेब मंडळाच्या सचीवानी वॉच ॲड मॉनिटर केले पाहिजेत अशा आंदेशवजा सूचना केल्या. या पार्श्वभूमीवर शासनाने जेव्हा पाच लाखाचे वार्षिक वाढीव अनुदान मंजूर केले, तेव्हा मंडळाने त्याबाबतीत निश्चित उद्दिष्टे ठरवून दिली व त्यानुसार अनुदान खर्च करावे, अशा सूचना संबंधित संस्थांनी केल्या.

साहित्य संस्कृती व्यवहारात सांप्रतचे शासन कधीही हस्तक्षेप करत नाही. उलट या शासनाने सांस्कृतिक धोरण उदारतेचे व सामंजस्याचे आहे. साहित्यिकसंस्था व शासन यांनी सहकार्याने सौहार्दाने वागावे. असेच मंडळालाही वाटते. मंडळातर्फे विविध नियतकालिकांना वार्षिक अनुदान दिले जाते. त्यातही मंडळाने या वर्षीपासून वाढ केली आहे. प्रारंभी म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्राची साहित्यसंस्कृतीची परंपरा थोर आहे. तशीच या पुढेही चालावी, असे एक साहित्यिक म्हणून प्रथम आणि राज्य साहित्य संस्कृती मंडळाचा अध्यक्ष म्हणून त्यानंतर, मला वाटत आले आहे. व त्यानुसार या मंडळाचा कारभार मी चालवतो आहे. त्यामध्ये माझ्या या सर्व सदस्य सहकाऱ्यांचा मला एकमुखी पाठिंबा आहे. त्यामुळे माझ्या कारकिर्दीत या मंडळाच्या कालावधीमध्ये महाराष्ट्राची साहित्य संस्कृती अधिकाअधिक उजळ करण्याचे माझे व्रतस्थ कार्य चालूच राहणार आहे.